श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ३ रें.] पौष शके १८४७ [अंक १० वा

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

## अनुक्रमणिका.


स्फुट विषय ... ... ... ... ...
महाराजांचे अनुभव ... ... ... ... ३०३-३५०
श्री साईसच्चरित ... ... ... ... ४०३-४०७
२२२-२३२


### शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३०३ | १ | पण्यतिथीचे | पुण्यतिथीचे |
| " | " | उगवाचा | उगवाना |
| ३१५ | ४ | १२ रा. रा. | रा. रा. |
| ३१७ | खालून ६ वी | ५॥ | ५ |
| " | खालून २ री | १३४॥= | १३६६= |
| ३१८ | २ | २९४॥= | २९४।॥= |
| " | ३ | १३४॥= | १३६६= |

## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतु याची छपाई व खर्चवेंच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यांमधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत करणाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

—— गोविंद रघुनाथ दाभोळकर.

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे बी. बी. सी. आय. रेल्वे.

## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु.३।=व्ही. पी. नें रु. ३॥ चालू अंक -।= मागील अंक शिल्लक असल्यास -॥-

पूर्वीच्या अंकांत व्ही. पो. नें रु. ३॥= चुकून छापलें गेलें. असेंच यंदा ज्या कांहीं वर्गणीदारांकडे रु.३॥ ची व्ही.पी. चुकून गेली, त्यांचे -।- आमचेकडे जमा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पाठवून देऊं.

## शके १८४७ चे पुण्यतिथीचे उत्सवाचा हिशोब.

**जमा**

| | |
|---|---|
| ८८४।≈।। | कोणी भक्तांकडून खाली जोडलेल्या यादी प्रमाणें. |
| ६ | व्याज रा. रा. निळकंठराव सहस्त्रबुद्धे यांनी दिलेल्या. नोटीचें |
| ६६।।।≈। | श्रीचे समाधीपुढील पेटींत व मशिदीचे पेटींत पांच दिवसांत दक्षिणा आली ती. |
| ८८८।। | भिक्षाः पुण्यतिथीच्या दिवशीं शिर्डी गावांत मिळाली ती. |
| ९६५।≈।। | |

**नावें**

| | |
|---|---|
| ५ | श्रीराम मारुती महाराजांचे पुण्यतिथी प्रीत्यर्थ पाठविले ता. २८-८-२४ |
| ५ | सदर ता. १७-८-२५ |
| ६ | गतवर्षीचे हिशोबांत चहाचे डब्याची किंमत लिहावयाची राहिली ती. |
| १०।। | गलेफाचे कापड. |
| -।।।- | शिलाई. |
| ।।= | निशाणाचे कापडासाठी रंगाच्या वड्या. |
| २६।।।≈ | निमंत्रण पत्रिकांसाठीं पोस्टेज |
| १ | सुवासिक तेल. |
| ५ | शेरा. |
| ६१। | आचाऱ्यांचा पगार. |
| ३। | कागदाची फुलें, माळा वगैरे |
| १३ | बाजेवाले यांस दिले. |
| २ | घोड्याची ओवाळणी. |
| १० | श्री मारुतीबुवा यांस दिले. |
| ३ | रा. सोपानदेव सोनार यांस दिले |
| २८।।। | रोषनाई खर्च. |
| ९।।≈।। | प्रसाद पाठविण्यास पोस्टेज |
| १९।।=। | देवस्थानचे सामानाबद्दल. |
| १३।/. | खैरात. |
| ७८≈।।। | दक्षिणा व पूजा खर्च |
| १।।।= | किरकोळ पोष्टखर्च. |
| ६८८८≈।। | भोजन खर्च. |
| ९२० | |
| ४५।≈।। | बाकी शिलक |
| ९६५।≈।। | |

## शके १८४७ चे शिर्डी येथील पुण्यतिथीचे उत्सवास वर्गणी देणारांची यादी.

५ रा. रा. श्रीरामप्रसाद नरसिंहप्रसाद बूच

२५ „ वसंतराव नारायण गोरक्षकर, मुंबई.

१० „ बाळकृष्ण पी. पाटील, सांताक्रूझ.

५ „ माधवराव घनश्याम गोठूसकर, मुंबई.

२५ „ बाळकृष्ण माधवराव मानकर, वांद्रे.

५ „ मोरेश्वर सखाराम सामंत. कलेक्टर आफीस ठाणें.

५ „ सोराबजी एन. कूपर पेन्शनर स्टेशन मास्तर, दादर कालनी नं. ६५४

५ „ कृष्णराव विठ्ठल चिंचघरकर नं.६६५ लेडी जमशेटजी रोड दादर.

५ „ श्रीकृष्ण नीळकंठ चौबळ, लॅबरनमरोड, मंत्री बिल्डींग गांवदेवी पो. ग्रांटरोड मुंबई.

२ „ यशवंत जनार्दन गाळवणकर. बी. ए. टर्नर रोड, वांद्रा.

५ „ गोविंद रघुनाथ दाभोळकर पेन्शनर फ. क्लास मॅजिस्ट्रेट ५ सेंट मार्टिन्स रोड वांद्रा

३ „ राजाराम केशव वालावलकर. बी.ए.११३ केळेवाडी, मुंबई.

१॥ „ यशवंत रघुनाथ टिपणीस सीनिअर देवास, सी. आय.

३ „ गोपाळ दिनकर जोशी ५९९ नंबर; सदाशिव पेठ, पूना.

५ „ रजबअली महमदअली. टर्नररोड वांद्रा.

५ रावबहादुर वासुदेव अनंत बांबर्डेकर, बुलियन कीपर, मिंट, मुंबई.

९ रा. रा. त्रिंबक अनंतराव कर्णिक. कर्णिक लॅाज कल्याण जि. ठाणें.

५ त्यांचे स्वतांचे

२ रा. रा. द्वारकानाथ मुकुंद दुरवे.

१ „ गोविंद लक्ष्मण फणसे.

१ „ शंकर वसंत प्रधान.

---

९

---

१२३॥

१२४॥

१ रा. रा. कृष्णाजी लक्ष्मण वायचकर. वकील, सोलापूर

५ श्रीमती गोदावरीबाई लब्हेकर मुंबई. नि. मोरेश्वर गजानन श्रीमणी धोब्याच्या कारखान्यानजीक.

६ रा. रा. खंडेराव माधवराव विजयकर. हिरजीच्या वाडींत, डानलेन पोस्ट गांवदेवी मुंबई. नवीवाडी, ईस्टसाईड. मुंबई नं. २

५ रा. रा. विष्णु गोविंद. मुंबई कॉटन मिल

२ ” जे. आर. दळवी. पेण.

७ ” शामराव भास्कर चौवळ वांद्रें.

१० कुमारी कुमुदिनी पद्मनाभ धोंड. राई, नगर कोळगांव, पोस्ट आवास तालुके अलिबाग.

५ रा. रा. जी. के. रेगे अमीन झारापूर, होळकर स्टेट.

६ ” एन. ए. सावंत, सबइन्स्पेक्टर ऑफ पोलीस एसप्लेनेड पोलीस स्टेशन, मुंबई.

१० ” आर.एच. वाटवे. गव्हर्न्मेंट टेलीग्राफ ऑफीस अहमदाबाद.

२ ” एल. बी. घोगे, नासिक सिटी.

२॥ ” मोरेश्वर माधवराव दैसकर. शहापूर. जि. ठाणें.

६ ” पांडुरंग टी. कोपीकर. पेन्शनर, सारस्वतपूर. धारवाड.

२ ” शंकर भिकाजी मोहिते नागाव. तालुके अलिबाग. जि.कुलाबा

१० श्री. सौ. मथुराबाई रामचंद्र विश्वनाथ दिवाडकर. मांडवा. तालुक अलिबाग, जि. कुलाबा

१ रा. रा. के. जे. भीष्म मोहोप. डि. नागपूर

१० श्री. चंद्राबाई बोरकर कुर्ला जि. ठाणें.

१५ रा. रा. केशव सावळाराम कुळकर्णी कडूस. जि. पुणें.

५ स्वतःचे

१० गावांत गोळा केलेले.

---

१५

---

२२५

१ रा. रा. मोरेश्वर विष्णु जोशी डेंगणमाल जि. ठाणे,
५ ,, आर. बी. उपासनी महाळकर पुणे.
२ ,, कृष्णाजीराव दत्ताजीराव मालविणकर, पार्वतवाडी, जि. रत्नागिरी.
१० ,, दाजी विठ्ठल सांबारे. चिंचपोकळी, जावजी बिल्डिंग मुंबई.
७ ,, रामचंद्र सिताराम देव, स्टॅंप व्हेंडर, अंधेरी.
२ स्वत:चे
२ रा. रा. विष्णु बळवंत पितळे, पार्ले.
२ हरिश्चंद्र रामजी मेस्त्री.

---

७

१० रा. रा. डी. एम्. राजा. देसाई बिल्डींग पार्सी कॉलनी, दादर
२ ,, ,, विनायक आपाजी वैद्य अंधेरी
१ ,, ,, बळवंत आपाजी वैद्य अंधेरी
१ सौ. सीताबाई राजाराम वालावलकर नं, ११३ फोळेवाडी मुंबई.
१० श्री. सुलोचनाबाई वाकडे मेरी बिल्डिंग बांद्रे.
५ ,, शांताबाई अझांडकर कामत बिल्डींग पोस्ट नं. २ मुंबई.
१ रा. रा. शंकर रामचंद्र कानजी न्हईची आड वेंगुर्ला.
७ ,, जे. के. परुळकर
२ स्वत:चे
५ श्रीकृष्ण गोपीनाथ द्विवे
{ C/O. मेसर्स मूळजी जेठा आणि कं० रायल इन्शुअरन्स बिल्डींग चर्चगेट स्ट्रीट मुंबई.

---

७

१० ,, आत्माराम केशव कुळकर्णी कारभारी जमखिंडी.
२ ,, एस्. जी. परुळकर अमीन भिकवगांव जि. नेमाड इंदूर स्टेट

---

३०१

१५ श्री सद्गुरूचा एक नम्र सेवक, २३४ रास्ते पेठ, पूना सिटी.
१० त्यांचे स्वतःचे;
५ त्यांच्या मुलीचे
१ रा. रा. दत्तात्रय महादेव चौवळ. मेरी बिल्डींग वांद्रे.
१ „ शिवराम नारायण दीक्षित. मेरी बिल्डींग वांद्रा
४ „ चिंतामण रामनाथ सातघरे. बाजार पेठ, रामाच्या देवळाजवळ वांद्रे
१ „ शामराव हरी सुखटणकर
५ „ सदाशिव आपाजी मुणगेकर कोळीवाडी, फणसवाडी मुंबई नं. २
५ „ बाळकृष्ण भिकाजी उर्फ दादा परब, शहापूर जि. ठाणे.
२ „ बाळाप्पा सातलिंगाप्पा
२ „ बाबाजी आनंदराव मोहिले, मुक्काम पालघर, सखाराम जीवन पाटील यांची चाळ.
० डॉ. के. व्ही. सावे. ३ वनाम हॉल लेन. गिरगांव मुंबई
७ रा. रा. बी. व्ही. देव ठाणें;
४ स्वताचे १ पार्वतीबाई ओझारकर २ वासुदेव रामचंद्र घोलप
१ रा. रा. शांताराम लाडकोबा तोरसकर, जमशेटजी रोड डॉ. धुरुची चाळ खोली नं. ३ दादर मुंबई.
„ त्रिंबक खंडेराव कुळकर्णी. प्रभुआळी, सी. एस्. घर नं. ६१६।१७ कल्याण.
„ दामोदर सावळाराम रासने. सावळाराम नामदेवाचें दुकान अहमदनगर.
.४

३६४

१८ रा. रा. गोविंद नारायण सामंत, रेल्वे स्टेशनानजीक बांद्रे.
५ स्वतःचे.
१० डॉ. रंगनाथ नारायण गवाणकर
१ सौ. यमुनाबाई रंगनाथ गवाणकर
२ रा. रा. गोविंद लाडोबा पेडणेकर.
---
१८

१ „ लक्ष्मणराव वाळिंबे. मेमन लॉज बांद्रे.
५ „ एस्. व्ही. पाटील. न्यु पॅलेस अक्कलकोट.
२ „ शंकर परशाराम सामंत, बंदर कारकून, वसई, जि. ठाणे.
५८≈ „ वासुदेव अनंत गोकर्णकर. सौ. इंदिराबाईचा कँप इंदूर
१० „ त्र्यंबक लिंबाजी कोडळ, कामाठीपुरा ८ वी गल्ली, मुंबई.
२५ सौ. चंद्राबाई आर. बोरकर उबरगांव, जि. ठाणा.
५ रा. रा. डी. एम्. रत्नपारखी. सबजज्ज मलकापूर.
५ „ गणेश पांडुरंग बेंद्रे पेन्शनर मास्तर गुंदवली पोस्ट अंधेरी.
२ सिताबाई रामचंद्र सामंत
१०॥ रा. रा. राजाराम केशव वालावलकर नं० ११३ कोळेवाडी. मुंबई.
५ शिवराम गणेश गुप्ते.
१। „ „
१। गोपाळ रघुनाथ राजे
१ गणपत, मोरेश्वर कोठारे.
१ चंपुबाई गणपतराव कोठार.
१ सदानंद विनायक तळपदे.
---
१०॥

४५२॥≈

५२१।॥

५ पार्वतीबाई रांगणेकर. मुंबई

१ रा. रा. सदानंद बी. कुडाळकर स्वार रोड वांद्रे.

६ " रामचंद्र वासुदेव पैसास आर. एम्. एस्. मनमाड.

५ श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकर रंगारी चाळ वांद्रे.

१० दत्तभक्त जी. आर. दाभोळकर अहमदाबाद.

१० कीर्तनेसाहेब, वासुदेव गंगाधर पंडीत, खजुरी बाजार घर नं. २२ इंदूर सिटी.

५ जनाबाई घटे घ. नं ५६०, कसबा पेठ सोलापूर

२ चंपुबाई आर. चोणकर. खोली नं. ५९ खटाव बिल्डींग, परळ

५ रा. रा. चिंतामण नारायण सोनटक्के, कापड बाजार, अहमदनगर

५ " नारायणराव, ४८ नंबर, इमलीबाजार इंदूर

६ " गजानन. माल्वण मरड.

५ " आनंदराव सुंदरजी धराधर. नवीवाडी मुंबई पोस्ट नंबर २

५ " डॉ. एच. आर. क्लार्क. चीफ मेडीकल आफीसर, क्वांबे

३। " गोविंदराव नारायण गुप्ते, कोज क्लार्क मरीनलाईन्स मुंबई

१। " आनंदराव मंगेश कावाडे. मुगभाट क्रॉस गल्ली मुंबई.

१ " शिवराम गणेश वळंजु, बाजार पेठ. रत्नागिरी

१। " दामुअण्णा नारगोळकर दहिसार. ता. माहीम पो. पालघर जि. ठाणे.

५ " गणेश हरी वाटवे स्टेशन मास्तर पेडगांव व्हाया मनमाड

५ " द्वारकानाथ हरी देशमूख. डोलखांब पो. किन्हली. जि. ठाणे

२ " बाबाजी कानोजी जमादार डोलखांब पो. किन्हली. जि. ठाणे

१। " सदाशिवराव परांजपे. रंगारी जुनी चाळ वांद्रे

१ " ह. गो. सकपाळ बंदरवाडी वांद्रे

५४२।॥

५४२॥=

१ काजीसाहेब मिया अबदुल रहीमान कल्हई बाजारानजीक वांद्रे.

१ रा. रा. के. बी. मास्तर.

१॥- रावसाहेब धोंडू विष्णु पगळकर डि. रिक्रुटिंग ऑफीसर मिरज.

२ के. खुसरू खंडाळेवाला, प्रे. मॅजिस्ट्रेट ब्रूज रोड मुंबई.

२८= रा. रा. महादेव जी. कोरान्ने. टाटा हायस्कूल, बिलीमोरा.

१।= श्री. यशोदाबाई नारायण नाईक

१ रा. रा. श्रीपाद हरी चिटणीस कोरगांव जि. सातारा.

२ ,, आर. एच्. दावे गव्हर्मेंट टेलीग्राफ ऑफीस, अहमदाबाद.

५ ,, त्रिभुवन नरोत्तम अढिया, डहाणू जि. ठाणें.

२॥ ,, गोविंद विनायक मोडक मुरारीशेटची चाळ. मुरबाड रोड कल्याण ( जि० ठाणे )

५८/- ,, उद्धव नारायण नवगिरी. वेताळपेठ पूना सिटी

१० ,, एच्. सी. कूपर १०५ अपालो स्ट्रीट फोर्ट मुंबई

१ ,, नारायण बाळाजी राणे क्लार्क सरकारकुन आफिस राई जि. ठाणे

१। श्री. शांताबाई कुंजीलाल मास्तर अग्नीहोत्री यांची मुलगी. हर्दा

१ रा. रा. राम नारायण भिकाजी पंडीत खांडवा

२ ,, देऊ हरशेट काळण उसरोली पो. वावोशी जि. कुलाबा

२ ,, आनंदराव पर्शराम डोळस मराठी शाळेच्या समोर कांदिवली

१ ,, लाला लखमीचंद C/o जोशी कालीदास गोविंदजी भुवन वीलेंपारला

५ ,, मोरेश्वर नारायण सांवे, कॉरनर डॉमरलेन गांवदेवी गोरेगांवकराची चाळ, दादर

५ ,, एन. बी. वढावकर

२० ,, एम. जी. गोठसकर

५ ,, गोपिनाथ रामचंद्र धुरंधर; भाऊरावाची वाडी, ठाकुरद्वार मुंबई

६२०॥

१२०॥
२ रा. रा. गंगाधर नारायण चौबळ मेमन लॉज वांद्रा.
१ „ भिकाजी रामचंद्र जोशी मुंबई
५ „ गो. ना. दाभोळकर वांद्रे
११ „ बाळकृष्ण राघोबा सावंत, रेल्वे पोलीस वांद्रा
५ „ आत्माराम नथोबा जोशी
१ „ वामनराव प्राणगोविंद पाटील. बी. ए. एल्. एल्. बी. सॉलीसिटर
पार्ला पो. अंधेरी
७॥≈ शेट गजानन महादेव कोळवणकर पानसुपारी गादीवाला, दादर
१ रा. रा. रावजी महादू कुडव वांद्रे
२ „ बगुबाई करंजेकर, ५०९ सदाशिव पेठ पूना सिटी
५ रा. रा. बाळाजी गोविंद राऊने, कासार अहमदनगर
११ „ त्रिकमदास गोवरधनदास ओरिएन्टल हॅान्बी रोड फोर्ट, मुंबई
५ रा. रा. वामन लक्ष्मण चव्हाण हैद्राबाद बिल्डींग गिरगांव मुंबई
३ „ केशव अंबाजी नैतवाल कापडबाजार अहमदनगर
५ „ नरहर पुरुषोत्तम खाडीलकर, कमिशन एजंट कसबा पेठ
सोलापूर चक्रदेवाचा वाडा
५ „ एम्. पी. उपल्प मोदीखाना सोलापूर.
२ „ श्रीधर कृष्ण भगत डोंबिवली, तालुका कल्याण.
५ रावसाहेब विनायक गणेश देशपांडे रिटायर्ड डे.सु.आफ पोलीस जळगांव
५ श्री. यमुनाबाई सावंत, शिळोत्तर, तालुका वसई.
२॥ रा. रा. गोपिनाथ रामचंद्र सामंत.
२१ „ गोवर्धनदास गिरधरदास, डहाणू, जि. ठाणें.
२ „ धोंडू महादेव बगावकर माथेवाडी—सावंतवाडी.
५ „ एम्. टी. महागांवकर फोर्ट सोनगड.

७४४॥≈

७४४॥॥=

५ रा. रा. वामन सांवा केसरकर, वांदे. सावंतवाडी.
२ " वासुदेव सितारामपंत रातानजनकर, हदगांव.
१० " जीवनराव बाळकृष्ण कोठारी, खजुरी बाजार इंदूरसिटी.
१। " लाडू नारायण तेंडले वांदे, सावंतवाडी.
१। " केशव नारायण श्रृंगारपुरे, वाडें, जि. ठाणें.
३ " नारायण पुरुषोत्तम अवस्ती ३०८ शुक्रवार पुना सिटी.
५ " सदाशिव विश्वनाथ देव,फडणीस, पौड ता. हवेली जि. पुणें
५ " मथुरादास हीरजीशेट, अंजनवेल जि. रत्नागिरी.
२ " एस्. एस्. ताटरे. एल. ई. ई. इलेक्ट्रीकल इंजिनिअर, गिरगांव मॅजिस्टीक सिनेमा समोर, मुंबई.
५ डॉ. दिनानाथ अजिक्य एल्. एम्. एस्. घर. नं. १५१ काळ्बादेवी रोड मुंबई नं. २
१ रा. रा. दत्तात्रय आत्माराम जाखी.
१ " गणपतराव वाडकर, बाजाररोड वांद्रा.
३॥। " सावळाराम आत्माराम शिरोडकर स्कूल मास्तर कुर्ला.
१८८॥ " नारायण गोविंद काजळे c/o सुपरिंटेंडीग इंजीनिअर, बी. बी. रेल्वे मुंबई.
५ " गणेश दिनकर वैद्य.
२ " विष्णु बाळकृष्ण साने पापडी. ता. बेसीन. जि. ठाणे.
१५ श्री. गोदावरीबाई लव्हेकर, मराठी मुलीची शाळा. कुलाबा. मंबई.
१० पुण्यतिथीचे अंगवस्त्राबद्दल.
५ श्री. रमाबाईचे.

१५

८१३८=॥

८१३०॥

५ रा. रा. जी. के. गाडगीळ बार-एट-लॉ-५८० सदाशिव पेठ पुना सिटी

११ सौ. काशीबाई राणीसाहेब मालेगांवकर ४२ म्याहाळे पेठ पुणें शहर,

७॥ रा. रा. रामचंद्र रामकृष्ण सामंत पो. अर्नाळा जि. ठाणे.

२॥ " वासुदेव महादेव कोलंगडे परमनंट वे. इ. आफीस

३ " विष्णु सदाशिव बक्षी अरविंदे. जि. रत्नागिरी

३ " डब्ल्यु. जी. कानिटकर रजिष्ट्रार डि. कोर्ट अहमदनगर

२ " जनार्दन बाजी गाळवणकर अर्नाळा. जि. ठाणें

२४ " लक्ष्मण गणेश महाजनी पुणें.

५ " वासुदेव कृष्ण सांडू, चेंबूर जि. ठाणे.

१। " ना. रा. खंडकर नि. श्री. स. जठार साहेबांची कोठी लक्ष्मीगंज लष्कर ग्वालेर.

७ सौ. कृष्णाबाई विनायक ताम्बेरकर मु॥ इंदूर.

८८४।≡॥

# श्री साईनाथ प्रसन्न

## श्री साईनाथ संस्थान शिर्डी एथील शके १८४७ च्या गोकुळ अष्टमीच्या उत्सवास आलेली वर्गणी वगैरे व उत्सवास झालेला खर्च.

### जमा

९६। मनिआर्डरीनें व रोखीनें आलेली वर्गणी

- ५ रा. रा. त्र्यंबक आनंदराव कर्णिक मु. कल्याण
- १५ रा. रा. दत्तात्रय सिताराम ओक मु. बेळगांव
- ३ श्री. अंबाबाई मुके
- ३ रा. रा. नारायण नरसिंह फडणीस मु॥ जळगांव
- १ रा. रा. रामचंद्र सीताराम देव मु॥ अंधेरी
- २ रघुनाथ हरी वाटवे मु॥ अहमदाबाद
- ५ रा. रा. लक्ष्मण गणेश मुंगी मु॥ नासिक
- ५ रावसाहेब विनायक गणेश देशपांडे मु॥ जळगांव
- ५ डॉ. हिरालाल क्लार्क मु॥ खंबायत
- १। रा.रा. सांवळाराम आत्माराम शिरोडकर मु॥ कुर्ला
- ५ रा. रा. गणेश आत्माराम सावंत

—— ५०।

९६।

### नावे

- ५।≡ टपालखर्च-निमंत्रणपत्रिका!
- ६।- विडया ५०० ॥≡; ग्यासलेट डबा १ रु. ४; मिर्ची २॥ शेर रु. १॥=.
- १।-॥ लसूण भाजी, वगैरे -।=; मीठ हळद वगैरे -|||=||.
- ६। गोडें तेल ४ शेर, २॥रु.; वेसन पीठ ॥=; श्रीमारुती बुवा गाडी भाडें जाणें व येणें ३८=.
- १० धर्मार्थ रू. ५. फिरकोळ रोख धर्मदाय वाटणें रु. ५
- १। फराळ दूध वगैरे खर्च-|||· मुरमुरे ८८१ -॥-,
- १५६॥ वर्गणी रुपानें आलेलें धान्य व गूळ खर्ची घातला ती रक्कम. गहूं ८२|||=; तांदूळ१३|||;गूळ५९|||=
- ८६॥ गूळ खरेदी
  - ३१। दाजी वामन चितांबर१।पल्ला दर २५.
  - ५५। नारायण गणपती शेळके प.८१|||११ दर ३०

——— ८६॥

२७३||-||

जमा

९६।

५०।

२ श्री. चंपूबाई रामकृष्ण चोण-
कर मु॥ परळ

१५ रा. रा. बापू रावो बोरावके.
मु॥ ममदापूर

२ ,, बापाजी लक्ष्मण कुळ-
कर्णी मु॥ शिर्डी

२ साकुरीकर दुकानदार

१५ ,, रामचंद्रदादा पाटील
कोते मु॥ शिर्डी.

९ ,, त्रिंबकशेट शिंपी राह-
तेकर.

९६।

१४ श्री. हरि सीताराम दीक्षित
यांचे मार्फत आलेली व.

५ रा. रा. रामप्रसाद नरसिंह-
प्रसाद.

५ ,, माधव घन:शाम
गोठुसकर

२ ,, यशवंत जनार्दन
गाळवणकर मु. वांद्रे

२ ,, गोविंद रघुनाथ
दाभोळकर मु. वांद्रे

१४

११०।

नावे

२७३॥-॥

१२ गहूं खरेदी

१२ रा. रा. तात्या पाटील १
मण. दर १२

३८≡ स्वयंपाकाची मजुरी

९८≡॥ प्रसाद पाठविण्याचा
सुंठवडा

१≡॥ सुंठ व साखर

७॥। प्रसाद पाठविण्या-

९८≡॥

साठीं टपाल खर्च

६९॥≡ रा. रा. त्रिंबक शिंपी
राहतेकर यांचें बील

८॥।-॥ देवस्थानचे विलाबद्दल.

३७६।≡॥

| जमा | | खर्च |
| --- | --- | --- |
| ११०। | | १०३।=॥ |
| १३॥०॥ | श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांचे मार्फत आलेली वर्गणी | |
| २ | रा. रा. आनंदराव धनाराम बोरकर मु. कांदिवली | |
| ५ | ,, दाजी विठ्ठल सावारे मु. मुंबई | |
| २ | ,, रघुवीर भास्कर पुरंदरे मु. बांद्रे | |
| २ | ,, भवान्या पोशा कोळी मु. बांद्रे | |
| २ | ,, वसंतराव आर. जुवारकर | |
| ०॥०॥ | डॉ. हरि भाऊ शिरसाठे मु. पुणे | |
| १३॥०॥ | | |
| १४॥-॥ | पेटीतील उत्पन्न. | |
| १५३॥ | धान्य गूळ वगैरे रूपानें आलेली वर्गणी. | |
| २८ | रा. रा. तात्याजी गणपतराव पाटील. | |
| | १३ गहूं १मण दर रु. १३. | |
| | १५ गूळ ६० शेर दर रु. ६० | |
| | २८ | |
| २९४॥।= | | ६७३।=॥ |

जमा

२९४॥=

२८

३९ रा. रा. पुनमचंद भागचंद मारवाडी गहूं मण ३ दर १३ प्रमाणें.

११ रा. रा. बाबुराव सखाराम गोंदकर.

६॥ गहूं ८ पायली

४॥ गूळ

११

६॥ रा. रा. त्रिंबक सखाराम शेळ्के. गहू ८ पायळी.

६॥ „ पुंजा धनगर. गहूं ८ पायली.

६॥ „ विरचंद मारवाडी गहूं ८ पायली.

४॥= „ काशिनाथ मार्तंड गांधी गहूं ६ पायली.

४॥ मुलतानचंद मारवाडी तांदूळ ४ पायली दर १८=

९ रा. रा. दलीचंद रायचंद, तांदूळ ८ पायली दर १८=

५॥ „ बाळा पुणेकर. गूळ २० शेर.

१३ रावसाहेब पानसे ओव्हरसिअर गूळ शेर५२दर३०रु.पल्ला

१३४॥=

२९४॥=

नांवें

३७६।≡॥

३७६।≡॥

जमा

२९४॥=

१३४॥=

३ रा.रा.लक्ष्मणबापाजी कुळकर्णी गूळ शेर १२

६। ,, नंदराम शिवराम मारवाडी गूळ शेर २५ दर १०

३८= ,, दाजी वामन चिदंबर गूळ शेर १५ दर २५ प्रमाणें

१० ,, नारायण गणपती शेळके गूळ शेर ४० दर ३० प्रमाणें

१५६॥

७॥। शिल्क सामान विक्री. पत्रावळी पुडे २ रु. ४; तांदूळ २ पायली रु. २॥। तुरीची डाळ ८८१ रु. १

७३॥।-। तूट आली ती उत्सव करणाऱ्यांकडून जमा.

३७६।=॥

नांवे

३७६।=॥

३७६।=॥

श्री चरणीं शिरसाष्टांग दंडवत. विनंती कीं, उत्सवाचे प्रसंगी ज्यांनी ज्यांनीं मदत केली असेल; त्यांना व सर्व भक्तांना परलोकचा उत्तम आशिर्वाद असावा. व कायम फंडाला रक्कम जमा करण्याविषयीं सर्व भक्तांना प्रेरणा करितील अशी समर्थ चरणीं सविनय प्रार्थना आहे.

ता. २४-१०-२५ इ. स.

तात्याजी गणपतजीराव पाटील कोते

रामचंद्र दादा पाटील कोते

मित्रवर्य रा. रा. अण्णासाहेब दाभोळकर, मु. वांद्रे. यांस: नीळकंठ
चंद्र सहस्त्रबुद्धे, मु. बडोदें. कृ. सा. न. वि. वि. श्रीसाईलीलेचा गतव-
र्षीचा बारावा अंक मिळाल्याबरोबर मी आपणांस पाठविलेलें पत्र प्रसिद्ध
होणार नव्हतें, तें अखेरीस बहुत वाटाघाट होऊन नऊ महिन्यांनीं यंदाच्या
नव्या अंकांत प्रसिद्ध झालेलें पाहून श्रीच्या लीलेचें कौतुक वाटलें. आतां
माझ्या विचारसरणीचा थोडासा खुलासा करितों. "वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः"
ह्या भगवदुक्तीमध्यें जसें सर्व वेदाध्ययनाचें फल ईश्वराचें समग्र ज्ञान होणें
हेंच होय असें सांगितलें आहे, तसेंच समग्र सनातन आर्ष ग्रंथाध्ययनाचेंही
तेंच फल आहे, असें "वेदे रामायणे चैव पुराणे भारते तथा ॥ आदौ
मध्ये तथा चांते ॥ हरिः सर्वत्र गीयते" ह्या गजेंद्रमोक्षान्तर्गत श्लोकांत
प्रत्यक्ष भगवान् श्री वेदव्यासांनीं सांगितलें आहे. जीवास हें ज्ञान प्रथमतः
प्राप्त झाल्याशिवाय त्याच्या अंतःकरणांत खऱ्या भगवद्भक्तीचा उद्भव होणें
शक्य नाहीं. ह्याचें कारण "आधीं आत्मयातें जाणावें ॥ मग तयातें साधावें ॥
एरवी नुसतें अनुभवावें ॥ काय म्हणूनी ॥" असें योगिराज श्री मुकुंदराज
ह्यांनीं आपल्या परमामृत नामक ग्रंथांत सांगितलें असून अंतःकरणशुद्धि
झाल्याशिवाय भगवद्भक्ती उत्पन्न होत नाहीं, असें "जन्मांतर सहस्रेषु तपो-
ध्यानसमाधिभिः ॥ नराणां क्षीणपापानां कृष्णे भक्तिः प्रजायते ॥" ह्या
अनुस्मृत्यंतर्गत श्लोकांत भगवान वेदव्यासही सांगत आहेत. सनातन आर्ष
ग्रंथ अथवा संतप्रणीत प्राकृत ग्रंथ ह्यांचें श्रद्धायुक्त अंतःकरणानें विचार-
पूर्वक श्रवण-मनन केलें असतां हीन प्रारब्ध नसलेल्या जीवास परोक्षज्ञान
होईल, आणि तेणेंकरून परमेश्वराविषयीं असंभावनारूप बुद्धिदोषही नष्ट
होईल. परंतु तेवढ्यानें ईश्वराविषयीं परमप्रेम भक्तीचा उद्भव होईलच असें
मात्र म्हणतां येत नाहीं. तसें प्रेम उत्पन्न होण्यास तें आपल्यापाशीं अखंड
असत आहे, अशा एखाद्या महात्म्याचा समागम होऊन मुकुंदराजांनीं "यापरी
परी पाहतां ॥ जीव अविद्याविरहिता ॥ काम्यकर्मातीता ॥ जाणिजे ऐसा ॥"
असें म्हटलें आहे, त्याप्रमाणें स्थितप्रज्ञाची लक्षणें प्रत्यक्ष अनुभविल्या-
शिवाय तीं बुद्धींत कायमचें वास्तव्य करीत नाहींत. येथपर्यंत बुद्धीची अवस्था

गेली म्हणजे “ यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ” ह्या श्रुतिप्रमाणें गुरुरूपी सगुणब्रह्माच्या उपासनेच्या द्वारें “ तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ” ह्या श्रुत्यन्वयें अपरोक्षज्ञानप्राप्तीस सुरवात होऊन अखेरीस “ बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ” ह्या भगवदुक्तीप्रमाणें मोक्षापर्यंत मजल जाऊन पोहोंचते, अशी जी माझी आतां पक्की खात्री झाली आहे, तिजबद्दलचें सर्व श्रेय श्री सद्गुरुसाईनाथांनीं सन १९१० साल अखेरीस मला मुद्दाम शिर्डीस प्रथमतः खेचून नेऊन दिलेलें दर्शन १ तदनंतर आपल्या एका भक्ताची सेवा मजकडून करून घेण्याच्या निमित्तानें मला दिलेला दीर्घ काल समागम २, आणि तेव्हांपासून मजवर अखंड असलेली कृपादृष्टी ३, ह्या त्रिवेणीसंगमाकडेच आहे. असो. आतां सद्गुरुविषयीं आणखी दोन मुद्यांचा थोडासा खुलासा करतों. तो असा:—

(१) “ प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षयः ” या नियमास अव्यक्त ईश्वरदृष्टीनें मुळींच अपवाद नाहीं; परंतु “ कर्तुं, अकर्तुं, अन्यथाकर्तुं ” असें आपलें अगाध, अतर्क्य ऐश्वर्य प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविण्याकरितां जेव्हां तो सद्गुरुरूपानें व्यक्त होतो, तेव्हां चिज्जडग्रंथिभेद करून मायामय, मिथ्या-जड देहापासून आणि त्याच्या प्रारब्धापासूनही निजभक्तास विभक्त करून त्याच्या प्रारब्धाचाही नाशच करितो. “ सर्वं कर्माखिलंपार्थ ॥ ज्ञाने परिस-माप्यते ” ॥ ह्याचा असाच अर्थ आहे. अशा तऱ्हेनें “ जन्म जरा आणि मरण ॥ देहा हाचि धर्म जाण ॥ क्षुधा तृषा सुख दुःख दारुण ॥ प्राण-मनाचे धर्म हे ॥ १ ॥ देहधर्म प्राणधर्म ॥ मनोधर्म इंद्रियधर्म ॥ ह्यांहूनि आत्मा निर्धर्म वेगळा आहे ॥ २ ॥ ” हा सिद्धांत पक्का उमजून ज्याच्या कृपेनें जीवास आत्मस्वरूपप्राप्ति होते, त्या कृपाघन सद्गुरुपाशीं असली अमो-लिक देणगी न मागतां मिथ्या, मायिक अशा कोणत्या वस्तूंची याचना यथार्थ होईल ? बाकी भक्तिमार्ग जगांतून नष्ट न व्हावा एतदर्थ जसें “ आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ” ह्यांचें ईश्वरभक्तीनें ईप्सितसाफल्य होतें, तसें सद्गु-रुभक्तीनेंही देहप्रारब्धानुसार होणारच, आणि पुढें कोणाचें काय काय होणार

योगेश्वरांना त्रिकालज्ञानानें सहजच समजत असल्यामुळें त्यांचे आशिर्वाद सफल होऊन लोकांची त्यांच्यावर श्रद्धायुक्त भक्ति जडते. ह्या माझ्या विचारांमुळेंच मला आधिभौतिक साक्षात्कार मुळींच होत नाहींत. परंतु भगवान वेदव्यासांनीं गजेंद्रमोक्षाच्या शेवटीं "गीतासहस्रनामैवस्तवराजोह्यनुस्मृतिः ॥ गजेंद्रमोक्षणं चैव पंचरत्नानि भारते" ह्या श्लोकांत नामनिर्देश केलेल्या महाभारतांतर्गत शुद्ध पराभक्तिपर पांच रत्नांपैकी आद्यरत्नाचें प्रथम मनन-पूर्वक अध्ययन, नंतर तदर्थाचें कथन करण्याविषयीं मला श्री समर्थांनीं कांहीं वर्षांपूर्वीं जी आज्ञा केली त्याकामीं त्यांच्या कृपेनें नित्य गीतार्थस्फुरण होत आहे तें मात्र अमोलिक आहे. कारण ज्ञानपूर्वक श्रद्धाभावी संतकृपा नाहीं व संतकृपेशिवाय नुसत्या शब्द पांडित्याच्या बळावर गीतार्थ समजणें अशक्य आहे; आणि तो उमजणें तर त्यापेक्षांही अशक्य आहे. तशा **पांडित्यानें मसालेदार** चिवडा मात्र होतो !

(२) पूर्ण वैराग्यशीलता ज्या महात्म्याचे ठायीं अखंड दृग्गोचर होत असेल, अशा पुरुषाचे ठायीं प्राय: ब्रह्मात्मैक्य ज्ञानही असतें, असा अध्यात्म शास्त्राचा सिद्धांत आहे, त्याच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळें पुष्कळ अल्पज्ञ जीवांचें प्रापंचिकदृष्ट्या बहुत नुकसान झाल्याकारणानें सांप्रत-कालीं खऱ्या खोट्याची निवड न होतां अनेक मिथ्याचारी गुरूंच्याबरोबर अति दुर्लभ असलेल्या महात्म्यांचीही टवाळकीच होत असते ! परंतु पूर्ण वैराग्यशीलत्वामुळें "समलोष्टाश्मकांचन" झालेल्या पुरुषानेंही जर कोणा-पाशीं कांहीं द्रव्य मागितलें, तर त्याचा त्यांत कांहींतरी सद्हेतु असावा अशी बुद्धी न होऊन त्याच्यावर विनाकारण दोषारोप करणें, म्हणजे आपल्या द्रव्यलोभात्मक जड स्थूलदृष्टीचें एका प्रकारें प्रदर्शन करणेंच होय, हेंही ज्यांना समजत नाहीं, त्यांच्याविषयीं विचारी पुरुष उपेक्षा हीच शुभवासना आपल्या अंत:करणांत ठेवणार ! असो साईलीलेच्या येत्या अंकांत हें पत्र प्रसिद्ध व्हावें ही विनंति.

श्री

श्री. संपादक साईलीला यांस.

वि. वि. ही सतिलकाव्यसेवा व्यष्टिरूप साईनाथाला अर्पण करून समष्टि नाथाला अर्पण होण्याकरितां येत्या अंकी स्थल द्याल अशी आशा आहे. शुद्धपंचांगाप्रमाणें पौष व. ११ मकर सं. )

शा. वि.

साधोनी निजभक्त आत्महित जो ईशासनीं बैसतो ॥
नानारूप विचार गूढ वदुनी थट्टेतही बोधितो ॥
माता जेविं मुलास चाल शिकवी हातीं धरोनीं सदा ॥
राजारंकसमान लेखि गुरु हा तेवी हरी आपदा ॥१॥

भुजंगप्रयात

किती वर्णुं मी सौख्य हें सद्गुरूचें ॥
जपें जातसे तर्क वायामनाचे ॥
यशाचा निधी सद्गुरू साइनाथ ॥
पदीं तील हे अर्पितो हा अनाथ ॥२॥

शिखरिणी

त्यजुनि धन सुखाशाभानु झाला पुढारी ॥
मकरिं बसुनि आला सर्व लोकोपकारी ॥
गिळिल मकर लोकां वाटलें या रवीला ॥
म्हणुनि दमुनियां त्या लावितो सत्पथाला ॥३॥

इंद्रवज्रा

भीती न आतां मकराकडोनी ॥
आनंदमाना रविला स्मरोनी ॥
सेवोनिया हा तिळगूळ आतां ॥
वृद्धी करा प्रेमभजा अनंता ॥४॥
ही मातृभूमी असुखी न राहो ॥
स्वातंत्र्य भाळीं झळकोन राहो ॥
ऐसी करा साइपदा विनंती ॥
काढील तो षड्रिपुजन्य भीती ॥५॥

के. जे. भीष्म

## रा. रा. गोविंद नारायण उर्फ बाबा सावंत यांचा साईबाबांबद्दल अनुभव

श्री समर्थ साईबाबा यांच्याबद्दल आवड उत्पन्न करण्यास कारण ह. भ. परायण दासगणू महाराजांची कीर्तनें हें होय.

एके दिवशीं मी घरीं बसलों असतां रा. रा. कै. रघुनाथराव तेंडूलकर हे सहज आले व त्यांनी श्री साईबाबांच्या फोटोची स्थापना कै. रा. वामनराव नार्वेकर यांचे येथें झाली असें सांगितलें. मी रागानें म्हणालों, "तेहतीस कोटी देव आहेतच; त्यांतच आणखी हा एक मिळून फायदा तो काय !" याखेरीज असेंच आणखीही याबद्दल थोडेंसें बोलणें झाल्यावर रा. रा. रघुनाथराव हे आपले घरीं परत गेले. त्याच रात्रीं मी स्वप्नांत साईबाबांचा एक मोठा फोटो पाहिला. त्याचा एक डोळा उघडलेला पाहिला व म्हणालों "अरे, हा म्हातारा तर जिवंत दिसतो. इतक्यांत दुसराही डोळा उघडून मजकडे पाहूं लागले. तो देखावा पाहून मला बाबांकडे जाण्याची प्रबळ इच्छा झाली व ईस्टरच्या रजेंत मी कांहीं स्नेह्यांबरोबर गेलोंही. गेल्याबरोबर नमस्कार वगैरे करून कांहीं वेळ जवळ बसलों व नंतर इतरांबरोबर जेवावयासाठीं वाड्यांत गेलों. दुपारीं पुन्हां गेलों तेव्हांही बाबांस नमस्कार करून त्यांचे बाजूस पण जवळच बसलों. तेव्हां बाबा मजकडे पाहून आपणाशींच बोलूं लागले कीं, "मी लई लांब रहात होतों त्या ठिकाणीं सांजच्या बकऱ्यांचा बाजार भरतो. जवळच समुद्रही आहे. त्या ठिकाणीं मी पुष्कळ वर्षें राहून कंटाळलों. माझ्या बापूस मी ओळखतों." हें ऐकून मला वाटलें कीं ह्यांचें येथें बरीच वर्षें राहणारे व नुकतेच पडदानशीन झालेले परमपूज्य श्री. मौलाना पीर साहेब यांच्याकडे मी जी कांहीं वर्षें जाण्यायेण्यांत वागलों त्याच्याबद्दल हें बाबांनी मला स्मरण दिलें. हें पाहून बाबांबद्दल माझे मनांत अधिक आदर वाटूं लागला. रजा संपत आली. आज दुपारीं निघून

गेलेंच पाहिजे व तसें जातां आलें नसतें तर उद्यां कामावर हजर राहतां येईल म्हणून इतर मंडळीबरोबर मी पुन्हांही दर्शनास गेलों. पाहतों तों बाबा एकाएकीं इतके संतप्त झाले कीं त्यांच्या समोर उभे राहणें हें त्यांच्या रोजच्या सहवासां-तील माणसांसही कठीण वाटूं लागलें. रजेविना शिर्डी सोडून जातां नये अशी पद्धत असल्यामुळें व रजा मिळणें तशा स्थितींत तर शक्यच नव्हतें. अर्ध्या-तासाच्या आंत जर निघणें झालें नाहीं तर उद्यां आफिसांत कसें जावें ही चिंता. मंडळीची बरीच गर्दी, मला हा पहिलाच प्रसंग असें असल्यामुळें काय करावें तें सुचेना. नोकरीबद्दल धास्ती वाटूं लागली. तेव्हां ज्या ठिकाणीं मी उभा होतों त्या ठिकाणींच मनांत जशी परमेश्वराची करितात त्याप्रमाणें बाबांची प्रार्थना केली कीं, आपण यावेळीं अगदीं शांत चित्त होऊन जेवढे जाणारे आहेत त्या सर्वांना रजा द्यावी. प्रार्थना चालली असतां माझें चित्त सद्‌गदीत झालें व डोळ्यांवाटे पाण्याचें थेंब आले. तोंच बाबांनीं आपले डोळे मजकडे लाविले. एक सेकंद झाला असेल इतक्यांत रा. रा. माधवराव देशपांडे यांजकडे वळून शांत चित्तानें बाबा म्हणाले "ज्यांना जायाचें आहे त्यांना म्हणावें उदी घ्या." नंतर बाबांच्या चरणावर डोई ठेऊन त्यांनीं आपले हातानें दिलेली उदी घेऊन मुंबईस वेळेवर येऊन पोहोंचलों. माझ्या मोठ्या मुलीच्या लग्नासंबंधानें जुळवाजुळव करण्यांत मी बरेच महिने परिश्रम केले. परंतु बरेच दिवस योग्य असें स्थळ जमलें नव्हतें. एके रात्रीं तर झोंपच येईना. व याचबद्दल विचार सुरू झाले. दिवा लावून घड्याळा-कडे पाहिलें तों दीड झाला होता. तेव्हां समोरच साईबाबांचा फोटो होता; त्याजकडे पाहिलें व मोठ्या मिनतवारीनें अशी प्रार्थना केली कीं "महाराज आपण सर्वज्ञ आहांत. मी अगदींच या कामी नवखा आहे. तेव्हां ज्या मुलाचा संबंध इच्याबरोबर आपण निश्चित केला आहांत तें स्थळ मला हुड-कवण्यास न लावतां तें एकदांचें लवकर जमावें अशी कृपा करावी" असें म्हणून साष्टांग नमस्कार घातला. चमत्कार असा कीं, दुसरेच दिवशीं संध्या-काळीं पांच वाजतां कै० वा० रा. रा. भाऊराव दाभोळकर हे ज्या स्थळा-

तरल पुढें योग जमला त्याच स्थळाची खात्रीपूर्वक व पूर्ण आशाजनक माहिती घेऊन आले. व मग तर मी त्यांचे मनांत फारच आभार मानिले.

### श्री सद्गुरु साईनाथ प्रसन्न.

## श्री. हरि सीताराम दीक्षित यांस आलेला महाराजांचा अनुभव

एकदां मी महाराजांचे जवळ बसलों असतांना महाराज एकसारखे कण्हतांना दिसले. महाराजांची व्यथा पाहून मी मनांत तळमळूं लागलों. शेवटीं मी त्यांना म्हटलें, "बाबा, आपल्याला फार त्रास होत आहे. आणि आम्ही आपल्याला कोणत्याही तऱ्हेनें कामीं पडूं शकत नाहीं." त्यावर महाराजांनीं एवढेंच म्हटलें, "मी तर पुष्कळ कामीं येईन." दुसरे दिवशीं मला मुंबईस येण्याची आज्ञा झाली व मी मुंबईस आलों. मी तेथें आल्यावर नागपुराहून वडील बंधू आजारी असल्याचें पत्र आलें व त्यांना भेटण्यासाठीं मी नागपूरास गेलों. तेथें बसल्यावर महाराजांचे कण्हण्याचा व शब्दांचा उलगडा झाला. तो सर्व उलगडा मी नागपुराहून एका स्नेह्याला लिहिलेल्या पत्रावरून वाचकांच्या ध्यानांत स्पष्टपणें येईल म्हणून त्या पत्राचा उतारा याखालीं देतों.

रा. रा. हरि सीताराम यांनीं एका स्नेह्यास पाठविलेल्या पत्रांतील उतारा:—

लिहिण्यास आनंद वाटतो की, ती. स्व. भाईजी साहेबांची प्रकृति कालपासून थोड थोडी सुधारत चालली आहे. आदितवारचा दिवस फार वाईट गेला. मला तार पाठविण्याविषयीं त्यांनीं सांगितलें; पण लवकरच डॉक्टर आले व इतक्यांत तार करूं नका म्हणाले. तितक्यांत परम दयाळु बाबांनींही

दर्शन दिलें व त्याच रात्रीं त्यांचे एका स्नेह्यास तशाच अर्थाचा दृष्टांत दिला. "मी मत कागास येईन" हे शब्द ज्या दिवशीं मजजवळ उच्चारले तोच तो दिवस. काय तो कनवाळूपणा व किती अगाध शक्ति. "अनंतामुखींचा शिणे शेष गाता" हें कांहीं खोटें नाहीं. आम्हां मूढ जीवांना ते कण्हतांना दिसतात; पण त्याच वेळेला ते कोठें काय करीत असतात हें त्यांचें त्यानांच ठाऊक. त्यांचे पाय मला लाधले हें खरोखरच फारच मोठें भाग्य.

ते जन्मजन्मांतरीं सुद्धां अंतरूं नयेत हीच माझी प्रार्थना आहे.

वडील बंधूनां अजून घरांतल्या घरांत फिरूं लागण्याला पांच सहा दिवस लागतील. माझा मुक्काम येथें आठ दिवस होईल असें वाटतें."

## अध्याय ३६ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

आतां गताध्यायानुसंधान । रम्य चौर्यकथानिरूपण ॥
दिधलें होतें आश्वासन । दत्तावधान व्हा तया ॥ १ ॥
कथा नव्हे हें स्वानंदजीवन । पीतां वाढेल तृष्णा दारुण ॥
तिचेंचेंही कराया शमन । कथांतर कथन होईल ॥ २ ॥
जेणें श्रवणें सुखावे श्रोता । ऐसी रसाळ ती ही कथा ॥
निवारे संसारश्रांतव्यथा । सुखावस्था आतुडे ॥ ३ ॥
निजहित साधावयाचीं कामना । असेल जया सभाग्याच्या मना ॥
तयानें साईकथानिरूपणा । सादर श्रवणा असावें ॥ ४ ॥
संत महिमा अपरंपार । कवणा न वर्णवे सांचार ॥
तेथें कांय माझा अधिकार । जाणावें सांचार हें मजला ॥ ५ ॥
इतुक्या पुरें वक्त्याचेंमीपण । साई लाघवी घेऊन आपण ॥
कोणाही करवी निजगुणकथन । करवी श्रवण निजभक्तां ॥ ६ ॥
तो हा परात्परसरोवरहंस । १ हंसोसोहंवृत्ति उदास ॥
२ ब्रम्हंमुक्तसेवनोल्लास । ३ असमसाहस ज्यास ॥ ७ ॥
जया नसतां नाव गाव । अंगीं अपरंपार वैभव ॥
क्षणें करील रंकाचा राव । ४ भ्रूकुटी लाघव हें ज्याचें ॥ ८ ॥

---

१ मी तोच तो, तो तोच मी. २ ब्रह्मरूप मोत्यांचा चारा. ३ अत्यंत
४ कटाक्षलीला

तो हा तत्त्वज्ञानावतार । दावी साक्षित्वें साक्षात्कार ।।
मायानिराळा राहूनि दूर । घडवी प्रकार नानाविध ।। ९ ।।

तो जयावरी करी कृपा । दावी तया विविधरूपा ।।
अघटित घटना रची अमूपा । प्रौढ प्रतापा परिसा त्या ।। १० ।।

तया जे जे आकळिती ध्यानें । अथवा गाती प्रेमळ भजनें ।।
पडोंनेदी तयांचें उणे । सांभाळी पूर्णपणें तयांतें ।। ११ ।।

आवड निज कथांची बहुत ।। म्हणोनि आठव देई अनवरत ।।
करोनि श्रोत्यावक्त्याचें निमित्त । पुरवी मनोरथ भक्तांचे ।। १२ ।।

परमार्थाचा पूर्ण अभिमानी । प्रपंचावर सोडोनी पाणी ।।
जयानें जोडिला चक्रपाणी । अनंत प्राणी उद्धरिले ।। १३ ।।

देशीं विदेशीं जयातें भजत । भक्तिध्वज जयाचा फडकत ।।
दीना दुबळ्या पाळवीत । कामना पुरवीत सकळांच्या ।। १४ ।।

असो आतां हें परम पवित्र । परिसा सादर साईचरित्र ।।
श्रोत्या वक्त्याचें श्रोत्र वक्त्र । पावन सर्वत्र होवोत ।। १५ ।।

गोमांतकस्थ दोघे गृहस्थ । आले साई दर्शनार्थ ।।
दोघेही साई चरणीं विनटत । होऊनि आनंदित दर्शनें ।। १६ ।।

दोघे जरी बरोबर येत । साई दक्षिणा एकासिच मागत ।।
पंधरा रुपये दे मज म्हणत । तो मग ते देत आनंदें ।। १७ ।।

दुजिया पासीं कांहीं न मागतां । आपण होऊन पसतीस[3] देतां ।।
साई तात्काळ ते अव्हेरितां । अति आश्चर्यता तयातें ।। १८ ।।

ऐसिया तया समयातें । माधवरावही[4] तेथेंच होते ।।
पाहूनिया त्या विषमतेतें[5] । पुसती साईतें तें परिसा ।। १९ ।।

---

१ निरंतर २ बोलवीत ३ पस्तीसरुपये ४ माधवराव देशपांडे म्हणजे बाबांचा शामा ५ भेद वृत्तीस

बाबा ऐसें कैसें करितां । दोघे स्नेही बरोबर येतां ॥
एकाची दक्षिणामागून घेतां । परततां देतां स्वयें दुजा ॥ २० ॥

संतापासीं कां ही विषमता । आपण होऊनि एका मागतां ॥
स्वेच्छे कोणी देतां परततां । हिरमोड करितां तयाचा ॥ २१ ॥

अल्पवित्तीं धरितां प्रीती । बहुता लागी निर्लोभ वृत्ती ॥
असतों मी जरी अपुले स्थिति । ऐसी न रीती आचरितों ॥ २२ ॥

बाब्या तुजला ठाऊक नाहीं । मी तो कोणाचें कांहीं न घेईं ॥
येणें मागे मशीदआई । ऋणमुक्त होई देणारा ॥ २३ ॥

मजला काय आहे घर । किंवा माझा आहे संसार ॥
जे मज लागे वित्ताची जरूर । मी तो निर्धोर सर्वांपरी ॥ २४ ॥

परी ऋण वैर आणि हत्या । कल्पांतींही न चुकती कर्त्या ॥
देवी नवसिती गरजे पुरत्या । मज उद्धरित्यां सायास ॥ २५ ॥

तुम्हांस नाहीं त्याची काळजी । वेळे पुरती करितां अंजीजी ॥
अनृणी जो भक्तांमाजी । तया मी राजी सदैव ॥ २६ ॥

आरंभीं हा अकिंचन तयासीं । पंधरा देतांच केलें नवसासीं ॥
पहिला "मुशाहिरा देईन देवासी । भूल तयासी पडली पुढें ॥२७॥
पंध्राचे तीस झाले नंतर । तिसाचे साठ साठांचे शंभर ॥
दुप्पट चौपट वाढतां पगार । बळावला विसर" अत्यंत ॥ २८ ॥
होतां होतां जाहले सातशें । पातले येथें निजकर्मवशें ॥
तेव्हां मी माझे पंधरा हे ऐसे । दक्षिणा मिषें मागितले ॥ २९ ॥

---

१ कोणापासून येणें ठरलेली रक्कम २ बाबा जींत वास करीत असत ती मशीद ३ सर्व बाजूंनी ४ त्या करणाऱ्याला ५ भक्तोद्धार करणाऱ्या मला ६ अतिनम्रपणें केलेली विनवणी. ७ ज्याला ऋण नाहीं तो. ८ गरीब द्रव्यहीन. ९ पंधरा रुपये १० पहिला पगार ११ विस्मरण

आतां ऐक दुसरी गोष्ठी । फिरतां एकदां समुद्रकाठीं ॥
लागली एक हवेली मोठी । बैसलों ओटीवर तियेच्या ॥ ३० ॥
हवेलीचा ब्राह्मण मालक । होता कुलीन मोठा धनिक ॥
केलें स्वागत प्रेमपूर्वक । यथेष्ट अन्नोदक अर्पुनी ॥ ३१ ॥
तेथेंच एका फडताळा पाशीं । स्वच्छ सुंदर जागा खाशी ॥
दिधली मजला निजावयाशीं । निद्रा मजशीं लागली ॥ ३२ ॥
पाहूनि झोंप लागली सुस्त । दगड सारूनि फाडिली भिंत ॥
खिसा माझा कातरिला नकळत । नागविलें समस्त मज त्यानें ॥३३॥
जागा होतां हें जंव कळलें । एकाएकीं रडूं कोसळलें ।
रुपये तीस हजार गेले । मन हळहळलें अत्यंत ॥ ३४ ॥
त्यातो होत्या अवघ्या नोटा । होतां ऐसा अवचित तोटा ॥
भरला माझे हृदयीं धडका । ब्राम्हण उलटा समजावी ॥ ३५ ॥
गोड न लागे अन्नपाणी । होऊनि ऐसा दीनवाणी ॥
पंधरा दिवस तेंच ठिकाणीं । राहिलों बैसूनि ओटीवर ॥ ३६ ॥
पंधरावा दिवस संपता । सवाल करीत रस्त्यानें फिरतां ॥
फकीर एक आला अवचिता । मज रडतांना पाहिलें ॥ ३७ ॥
पुसे तो मज दुःखाचें कारण । केलें म्यातें समस्त निवेदन ॥
तो म्हणे हें होईल निवारण । करिशील सांगेन मी तैसें ॥ ३८ ॥
फकीर एक तुज सांगेन । देईन त्याचें ठावठिकाण ॥
तयालागी जाई तूं शरण । तो तुज देईल धन तुझें ॥ ३९ ॥
परी मी सांगें तें आचरें व्रत । इच्छितार्थ प्राप्तीपर्यंत ॥
त्यागा तूझा आवडता पदार्थ । तेणें तव कार्यार्थ साधेल ॥ ४० ॥

ऐसें करितां फकीर भेटला । पैका माझा मजला मिळाला ॥
मग मी तो धंदा सोडिला । किनारा धरिला पूर्ववत ॥ ४१ ॥
मार्ग क्रमितां लागली नाव । होई न तेथें मज शिरकाव ॥
तों एक शिपाई सुस्वभाव । देई मज ठाव नावेंत ॥ ४२ ॥
लागोनि सुदैवाचा वारा । आली नाव ती परतीरा ॥
गाडींत बैसलों आलों जंव घरा । दिसलीया नेत्रा मशीदमाई ॥४३॥
येथें बाबांची गोष्ट सरली । पुढें शामासी आज्ञा झाली ॥
घेऊन जाई ही पाहुणे मंडळी । जेऊं त्या घाली घरासी ॥ ४४ ॥
असों; पुढें पात्रें वाढिलीं । माधवरावांस जिज्ञासा झाली ॥
पाहुण्यालागी पृच्छा केली । गोष्ट ती पटली कीं तुम्हां ॥ ४५ ॥
पाहूं जातां वास्तवीक । साईबाबा इथले स्थायिक ॥
नाहीं समुद्र नांव नाविक । तयां हें ठाऊक केव्हांही ॥ ४६ ॥
कैचा ब्राह्मण कैची हवेली । जन्म गेला वृक्षाचे तळीं ॥
कोठूनि एवढी संपत्ति आणिली । जी मग चोरिली चोरानें ॥ ४७ ॥
म्हणोनि ही गोष्ट निवेदिली । तीही तुम्ही येतांच आरंभिली ॥
एणेंमिषें तुम्हांसी पटविली । वाटे घडलेली पूर्व कथा ॥ ४८ ॥
तेव्हां पाहुणे होऊनि सद्गद । म्हणाले साई आहेत सर्वविंद ॥
परब्रह्म अवतार निर्द्वंद्व । अद्वैत अभेद व्यापक ॥ ४९ ॥
तयांनीं जी कथिली आतां । अक्षरें अक्षर ती अमुचीच कथा ॥
चला हें गोड भोजन सरतां । कथितों सविस्तरता तुम्हांतें ॥ ५० ॥
बाबा जें जें बोलून गेले । तें तें सर्वचि कीं घडलेलें ॥
ओळख नसतां त्यां कैसें कळलें । म्हणून सगळें अघटित हें ॥ ५१ ॥

---

१ हवेली २ समुद्रकांठ ३ गलबत ( स्टीमर ) ४ सर्व कांहीं जाणणारे

असो; पुरें होतां भोजन । माधवरावासहवर्तमान ॥
चालले असतां तांबूलचर्वण । कथानिरूपण आरंभिलें ॥ ५२ ॥
वदे दोघांमाजील एक । घाटचि माझा मूळ मुलुख ॥
परी त्या समुद्रपट्टीचा देख । होता अन्नोदक संबंध ॥ ५३ ॥
तदर्थ गेलों गोमांतकांत । नोकरी मिळावी आलें मनांत ॥
आराधिला तत्प्रीत्यर्थ दत्त । नवसिला अत्यंत आदरें ॥ ५४ ॥
देवा-कुटुंब रक्षणार्थ । नोकरी करणें आहे प्राप्त ॥
तरी होऊनि कृपावंत । देई ती, लागत पायांस ॥ ५५ ॥
अद्य प्रभृति अल्पावकाशीं । जरी तूं निज ब्रीद राखिशी ॥
प्राप्ती जी होईल प्रथम मासीं । समग्र तुजसीं अर्पीन ॥ ५६ ॥
भाग्यें दत्त प्रसन्न झाला । अल्पावकाशीं नवसा पावला ॥
रुपये पंधरा पगार मजला । मिळूं लागला आरंभीं ॥ ५७ ॥
पुढें सांईबाबांनीं वर्णिली । तैशीच माझी बढती जाहली ॥
सय नवसाची समूळ बुजाली । ती मज दिधली ये रीती ॥ ५८ ॥
कोणास वाटेल घेतली दक्षिणा । दक्षिणा नव्हे ती फेडिलें ऋणा ॥
दिधलें एणें मिषें मज स्मरणा । अत्यंत पुराण्या नवसाचें ॥ ५९ ॥
तात्पर्य साई द्रव्य न याचित । निजभक्तांसही याचूं न देत ॥
अर्थहा नित्य अनर्थ मानित । भक्तां न पाडित तन्मोहीं ॥ ६० ॥
म्हाळसापतीसारिखा भक्त । सदां सांईपदीं अनुरक्त ॥
जरी संकटें चालवी चरितार्थ । तया न लव अर्थ जोडूं दे ॥ ६१ ॥
स्वयें सांई लोकां अनेकदां । दक्षिणामिषें आलेली संपदा ॥
वाटी परी न कपर्दिक कदा । देईन आपदात्रस्ता त्या ॥ ६२ ॥
तोही मोठा वाणेदार । जरी साई ऐसा उदार ॥
कधीं न तेणें पसरिला कर । याचना तत्पर होउनी ॥ ६३ ॥

सांपत्तिक स्थिति निकृष्ट । परी वैराग्य अति उत्कृष्ट ॥
सोशी गरीबीचेही कष्ट । अल्पसंतुष्ट सर्वदा ॥ ६४ ॥
एकदां एक दयाळू व्यापारी । हंसराज अभिधानधारी ॥
म्हाळसापतीस कांहीं तरी । द्यावेसें अंतरीं वाटलें ॥ ६५ ॥
पाहूनि गरिबीचा संसार । करावा शक्य तो उपकार ॥
लावावा कांहीं हातभार । सहज सुविचार हा स्फुरला ॥ ६६ ॥
ऐसी जरी तयाची अवस्था । इतर कोणीही देऊं जातां ॥
तेंही नावडे साईनाथा । द्रव्यीं उदासता आवडे ॥ ६७ ॥
मग तो व्यापारी काय करी । द्रवूनि त्या भक्तार्थ अंतरीं ॥
दोघेही समक्ष असतां दरबारीं । द्रव्य सारीत त्याकरीं ॥ ६८ ॥
होऊनिया अति विनीत । म्हाळसापती करी तें परत ॥
म्हणे साईचिया आज्ञेविरहीत । मजला न करवत स्वीकार ॥ ६९ ॥
भक्त नव्हता हा पैशाचा । मोठा भुकेला परमार्थाचा ॥
पदीं विनटला कायावाचा । प्रेमळ मनाचा निःस्वार्थी ॥ ७० ॥
हंसराज साईतें विनवी । साई एका कवडीस न शिववी ॥
वदे मद्भक्तांही द्रव्य न भुलवी । वित्ताच्या वैभवीं नगवेतो ॥ ७१ ॥
पुढें मग तो दुसरा पाहुणा । म्हणे माझ्याही पटल्या खुणा ॥
परिसा करितों समग्र कथना । येईल श्रवणा उल्हास ॥ ७२ ॥
पस्तीस वर्षांचा माझा ब्राह्मण । निरालस आणि विश्वासू पूर्ण ॥
दुर्दैवें बुद्धिभ्रंश होऊन । करी तो हरण मम ठेवा ॥ ७३ ॥
माझिया घराच्या भिंतींत । फडताळ आहे बसविलें आंत ॥
तेथील चिरा सारूनि अलगत । पाडिलें नकळत छिद्र तया ॥ ७४ ॥
चावावर जें फडताळ बदले । त्यासचि त्यानें छिद्र पाडिलें ॥
तदर्थ भिंतीचे चिरे काढिले । सर्वा निजलेले ठेवून ॥ ७५ ॥

१ अगदीं हळू

पुढें बाबा आणीक वदले । रुपये माझे चोरून नेले ॥
तेंही अवघें सत्यत्वें भरलें । पुडकें नेलें नोटांचें ॥ ७६ ॥

तीस हजारचि त्यांची किंमत । नकळे यावांस कैसें अवगत ॥
श्रम संपादित जातां वित्त । बसलों मी रडत अहर्निश ॥ ७७ ॥

शोध लावितां थकली मती ॥ नकळे कैशी करावी गती ॥
पंधरा दिवस चिंतावर्तीं । पडलों निगेती लागेना ॥ ७८ ॥

एके दिवशीं ओटीवर । बसलों असतां अति दिल्गीर ॥
वाटेनें चालला एक फकीर । सवाल करित करीत ॥ ७९ ॥

पाहूनि मज खिन्नवदन । फकीर पुसे खेदाचें कारण ॥
मग मी करितां साद्यंत निवेदन । सांगे निवारण तो मज ॥ ८० ॥

कोपरगांव तालुक्यास । शिरडी नामक एका गांवास ॥
करी साई अवलिया वास । करी तयास तूं नवस ॥ ८१ ॥

आवड तुझी जयावर । तयाचें सेवन वर्ज्य कर ।
" दर्शन तुमचें होईतोंवर । वर्जिलें " साचार वद तयां ॥ ८२ ॥

ऐसें मज फकीरें कथितां । अन्न वर्जिलें क्षण न लागतां ॥
वदलों " बाबा चोरी मिळतां । दर्शन होतां सेवीन तें " ॥ ८३ ॥

पुढे एकचि पंधरवडा गेला । नकळे काय आलें मनाला ॥
ब्राह्मण आपण होऊन आला । ठेवा दिधला मज माझा ॥ ८४ ॥

म्हणे माझी बुद्धि चळली । तेणें ही ऐसी कृती घडली ॥
आतां पायीं डोई ठेविली । क्षमा मी केली ऐसें वदा ॥ ८५ ॥

असो; पुढें झालें गोड । साईदर्शनीं उदेली आवड ॥
तेंही आज पुरविलें कोड । धन्य ही जोड भाग्याची ॥ ८६ ॥

---

१ चिंतेच्या भोंवऱ्यांत

असतां खिन्न दुःखी संकटीं । बसलों असतां आपुले ओटीं ॥
आला जो मम सांत्वनासाठीं । पुनरपि भेटी न तयाची ॥ ८७ ॥
जया माझी कळकळ पोटीं । जेणें कथिली साईची गोठी ॥
जेणें दाविली शिरडी बोटीं । पुनरपि भेटी न तयाची ॥ ८८ ॥
जयाची मज अवचित गाठी । सवाल घालीत आला जो वाक्पुटीं ॥
नवस करवूनि गेला शेवटीं । पुनरपि भेटी न तयाची ॥ ८९ ॥
तोच फकीर वाटे साचा । साईच हा अवलिया तुमचा ॥
लाभ आम्हां निज दर्शनाचा । द्यावया लाचावला स्वयें ॥ ९० ॥
कोणी कांहीं घेऊं लाचावती । मज या दर्शनीं इच्छाही नव्हती ॥
फकीर आरंभीं करी प्रवृत्ति । वित्त-प्राप्ती प्रीत्यर्थ ॥ ९१ ॥
तेंही वित्त जयाच्या नवसें । प्राप्त झालें अप्रयासें ॥
तो काय माझ्या या पसेतिसें । लाचावे ऐसें न घडेच ॥ ९२ ॥
उलट आम्हीं अज्ञान नर । आम्हां करावया परमार्थ तत्पर ॥
आमुच्या कल्याणीं झटे निरंतर । आणी वाटेवर या मिषें ॥ ९३ ॥
एतदर्थचि हा अवतार । ना तों आम्हीं अभक्त पामर ॥
होता कैचा हा भव पार । करा कीं विचार स्वस्थपणें ॥ ९४ ॥
असो; चोरी मिळाल्यावर । झाला मज जो हर्ष फार ॥
परिणामीं पडला नवसाचा विसर । मोह दुर्धर वित्ताचा ॥ ९५ ॥
पुढें पहा एक दिवस । असतां कुलाब्याचे बाजूस ॥
स्वप्नीं पाहिलें मी साईस । तैसाच शिर्डीस निघालों ॥ ९६ ॥
समर्थें कथिला निजप्रवास । मनाई नावेंत चढावयास ॥
शिपायानें करितां प्रयास । चुकला सायास तें सत्य ॥ ९७ ॥
या तो सर्व माझ्या अडचणी । पातलों जेव्हां नावेच्या ठिकाणीं ॥
खरेंच एक शिपाई कोणी । करी मनधरणी मजसाठीं ॥ ९८ ॥

१ पस्तीस रुपयाच्या दक्षिणेनें.

तेव्हांच नावेचा अधिकारी । आरंभीं जरी मज धिःकारी ॥
देवूनि मज ठाव नावेवरी । केलें आभारी मज तेणें ॥ ९९ ॥

शिपाईही अगदीं अनोळखी । म्हणे यांची माझी ओळखी ॥
म्हणोनि आम्हां कोणी न रोखी । बैसलों सुखीं नावेंत ॥ १००॥

ऐसी ही नावेची वार्ता । तैशीच ती शिपायाची कथा ॥
आम्हांसंबंधें घडली असतां । घेती निज माथां साई हे ॥ १०१ ॥

पाहूनि ऐसी अद्भुत स्थिती । कुंठित होते माझी मती ॥
वाटे मज इत्थंभूत जगतीं । भरले असती हे साई ॥ १०२ ॥

नाहीं अणूरेणू पुरती । जागा यथांच्यावीण रीती ॥
आम्हांस जैसी दिधली प्रचीती । इतरांही देतील तैशीच ॥ १०३ ॥

आम्हीं कोण, वास्तव्य कोठें । केवढें आमुचें भाग्य मोठें ॥
ओढून आम्हास नेटेपाटें । आणिलें वाटेवर हें ऐसें ॥ १०४॥

काय आम्हीं नवस करावा । काय आमुचा ठेबा चोरावा ॥
काय नवस फेडीचा नवलावा । ठेवाही मिळावा आयता ॥ १०५ ॥

काय आमुचें भाग्य गहन । नाहीं जयाचें पूर्वी दर्शन ॥
नाहीं चिंतन नाहीं श्रवण । तयाही स्मरण आमुचें ॥ १०६ ॥

मग तयाचिया संगतींत । वर्षोन वर्षें जे जे विनटत ॥
जे जे अहर्निश तत्पद सेवित । भगवद्भक्त ते धन्य ॥ १०७ ॥

जयासंगें साई खेळले । हंसले, बसले, बोलले, चालले ॥
जेवले, पहुडले रागेजेले । भाग्यागळे ते सर्व ॥ १०८ ॥

कांहीं हीन घडतां आम्हां हातीं । इतुकें आम्हा जैं कळवळती ॥
तुम्हांतेंही नित्य संगती ॥ भाग्य स्थिती धन्य तुमची ॥ १०९ ॥

---

१ जागा २ रागावले. ३ भाग्यवान.

वाटे तुमच्या पुण्यार्जित सत्कृती । धारण करयुनि मनुष्याकृती ॥
तुम्हींच परम भाग्यवंतीं । आणविली ही मूर्ती शिरडींत ॥ ११० ॥

अनंत पुण्याईच्या कोडी । तेणें आम्हां लाधली शिरडी ॥
वाटे श्रीसांईच्या दर्शनपरवडी । करावी कुरवंडी सर्वस्वीं ॥ १११ ॥

साई सज्जन स्वयें अवतार । महा वैष्णवसा आचार ॥
ज्ञानद्रुमाचा कोंभचि साचार । शोभे हा भास्कर चिदंबरीं ॥ ११२ ॥

असो, अमुची ही पुण्याई ॥ म्हणोनि भेटे ही मशीद आई ॥
नवस आमुचे फेडून घेई । दर्शन देई सवेंच ॥ ११३ ॥

आम्हां हाच आमुचा दत्त । एणेंच आज्ञापिलें तें व्रत ॥
एणेंच आम्हां बसविलें नावेंत । दर्शना शिरडींत आणिलें ॥११४॥

ऐसी सर्व व्यापकतेची । निज सर्वांतर्यामित्वाची ॥
दिधली सांईनीं जाणीव साची ॥ साक्षित्वाची सर्वत्र ॥ ११५ ॥

पाहोनिया सस्मित मुख ॥ झालें मनीं परम सुख ॥
प्र चीं विसरे प्रपंच दुःख । नसमाये हरिख परमार्थीं ॥ ११६ ॥

होणार होवो प्रारब्धगती । ऐशी व्हावी निश्चित मती ॥
साईचरणीं अखंड प्रीती । राहो ही मूर्ती नित नयनीं ॥ ११७ ॥

अगाध अगम्य साई-लीला । सीमा नाहीं उपकाराला ॥
वाटे तुम्हांवरुनी दयाळा । ओंवाळावा हा देह ॥ ११८ ॥

असो, आतां ऐका कथांतर । सावधान होऊनि क्षणभर ॥
साईमुखीं वदले जें अक्षर । तें तो निर्धार ब्रह्मलेख ॥ ११९ ॥

सखाराम औरंगाबादकर । निवासस्थान सोलापूर शहर ॥
पुत्र संतानालागी आतुर । पातलें कलत्र शिरडीस ॥ १२० ॥

साईबाबा संतपवित्र । ऐकून त्यांचें अगाध चरित्र ॥
सवें घेऊन सापत्नपुत्र । आली सत्पात्रदर्शना ॥ १२१ ॥

सत्तावीस वर्षे न्हातां । गेली परी न संतानवार्ता ॥
थकली देवदेवी नवसितां । निराशचित्ता जाहली ॥ १२२ ॥

असो; ऐसी ती सुवासिनी । हेतू धरू नि बाबांचे दर्शनीं ॥
आली ऐसी शिरडीलागुनी । विचार मनीं उद्भवला ॥ १२३ ॥

बाबा सदा भक्तजनवेष्टित । कैसे मज सांपडती निवांत ॥
कैसें कथिजेल माझें हृद्गत । म्हणोनि सचिंत जाहली ॥ १२४ ॥

उघडी मशीद उघडें अंगण । बाबाभोवतें सदां भक्तगण ॥
कैसा मिळेल निवांत क्षण । आर्द्र निवेदन व्हावया ॥ १२५ ॥

ती आणि तीचा सुत । नाम जयाचें विश्वनाथ ॥
राहिले दोन महिनेपर्यंत । सेवा करीत बाबांची ॥ १२६ ॥

एकदां माधवरावां विनवणी । विश्वनाथ अथवाकोणी ॥
बाबांपाशीं नाहीं पाहुनी । करी ती कामिनी ती परिसा ॥ १२७ ॥

तुम्ही तरी पाहूनि अवसर । माझिया मनीचें हें हार्द्र ॥
पाहूनि बाबा शांतस्थीर । घाला कीं कानावर तयांचे ॥ १२८ ॥
तेही जेव्हां असती एकले । नाहीं भक्त परिवारें वेढिले ॥
तेव्हांच कीं हें सांगा वहिलें । कोणी न ऐकिलें जाय असें ॥ १२९ ॥

माधवराव प्रत्युत्तर करिती । मशीद ही तो कधीं न रीती ॥
कोणी ना कोणी दर्शनार्थी । येतचि असती निरंतरी ॥ १३० ॥

साईचा हा दरबार खुला । येथें मज्जाव नाहीं कुणाला ॥
तथापि ठेवितों सांगून तुजला । आण कीं खुलासा हा ध्यानीं ॥ १३१ ॥

प्रयत्न करणें माझें काम । यशदाता मंगल धाम ॥
अंतीं तोचि देईल आराम । चिंतेचा उपशम होईल ॥ १३२ ॥

तूं मात्र बैस घेऊनि हातीं । नारळ एक आणि उदवत्ती ॥
सभामंडपीं दगडावरतीं । बाबा जेथं बैसती तें ॥ १३३ ॥

मग मी भोजन झालियावरती । पाहीन जेव्हां आनंदित वृत्ती ॥
खुणावीन कीं तुजप्रती । तेंव्हांच वरती यावें त्वां ॥ १३४ ॥

असो; ऐसें करितां करितां । प्राप्त घडीचा योग येतां ॥
एकदा साईचें भोजन उरकतां । पातली अवचिता ती संधी ॥१३५॥

साई आपुले हस्त धूतां । माधवराव वस्त्रानें पुसतां ॥
आनंद वृत्तीमध्यें असतां । ते काय करितात पहावें ॥ १३६ ॥

प्रेमोल्हासें माधवरावाचा । बाबा तंव घेती गालगुच्चा ॥
ऐसी ये संधीचा देवा-भक्ताचा । संवाद वाचा प्रेमाचा ॥ १३७ ॥

माधवराव विनयसंपन्न । परी रागाचा आव दावून ॥
विनोदें म्हणती बाबांलागून । हें काय लक्षण बरें का ? ॥ १३८ ॥

नलगे ऐसा देव खट्याळ । गालगुच्चे जो घेई प्रबळ ॥
आम्हीं काय तुझे ओशाळ । सलगीचें फळ हें काय? ॥ १३९ ॥

तवं बाबा प्रत्युत्तर देत । कधीं अवघ्या बहात्तर पिढींत ॥
कांविलों रे म्या तुज हात । असे कां स्मरत पहा बरें ॥ १४० ॥

तंव बोलती माधवराव । आम्हां पाहिजे ऐसा देव ॥
देईल जो मुके सदैव । मिठाई अभिनव खावया ॥ १४१ ॥

नलगे आम्हां तुझा मान । अथवा स्वर्गलोकींचें विमान ॥
जागो तुझिये पायीं इमान । इतुकेंचि दान देई मज ॥ १४२ ॥

तंव बाबा लागले बोलों । एतदर्थचि मी येथें आलों ॥
तुम्हांस खाऊं घालूं लागलों । लागलों लोलो मज तुमचा ॥१४३॥

---

१ आवड; प्रेम

इतुकें होतां कठड्यापाशीं । बाबा बैसतां निजासनाशीं ॥
माधवराव करितां खुणेसीं । बाई निजकार्यासी सादर ॥ १४४ ॥
खूण होतांच तात्काळ उठली । लगबगीनें पायऱ्या चढली ॥
बाबांचिया सन्मुख आली । नम्र झाली सविनय ॥ १४५ ॥
तात्काळ चरणीं अर्पिलें श्रीफळ ॥ वंदिले मग चरणकमळ ॥
बाबांनीं निज हस्तें तो नारळ । हाणितला सबळ कठड्यावरी ॥१४६॥
म्हणती शामा हा काय म्हणतो । नारळ फारचि रे गुडगुडतो ॥
शामा मग ही संधी साधतो । काय वदतो बाबांस ॥ १४७ ॥
माझिये पोटीं ऐसेंच गुडगुडो । बाई ही मनीं म्हणे तें घडो ॥
अखंड मन तंव चरणीं जडो । कोडें उलगडो तियेचें ॥ १४८ ॥
पाही तिजकडे कृपादृष्टी । टाक तो नारळ तिचे ओटीं ॥
तुझिया आशिर्वादें पोटीं । बेटा बेटी उपजोत ॥ १४९ ॥
तंव बाबा तया वदती । काय नारळें पोरें होती ॥
ऐशा कैशा वेड्या समजुती । चळले वाटती जनलोक ॥ १५० ॥
शामा वदे आहे ठाऊक । तुझिया बोलाचें कौतुक ॥
लेंढार मागें लागेल आपसुख । ऐसा अमोलिक बोल तुझा ॥१५१॥
परी तूं सांप्रत धरिशी भेद । नेदिशी खरा आशिर्वाद ॥
उगाच घालीत बससी वाद । नारळ प्रसाद देई तिस ॥ १५२ ॥
नारळ फोड बाबा वदत । शामा वदे टाक पदरांत ॥
ऐसी बरीच होतां हुज्जत । द्वारीस येत तंव बाबा ॥ १५३ ॥
म्हणती होईल जारे पोर । शामा म्हणे कधीं दे उत्तर ॥
वदतां बारा महिन्यानंतर । नारळ ताडकर फोडिला ॥ १५४ ॥
अर्धभाग दोघीं सेविला । अर्ध राहिला बाईतें दिधला ॥
माधवराव वदे बाईला । माझिया बोला तूं साक्षी ॥ १५५ ॥

बाई तुज आजपासून । बारा महिने भरतां पूर्ण ॥
जाहलें नाहीं पोटीं संतान । काय मी करीन तें परिस ॥ १५६ ॥
ऐसाच नारळ ओटींत घालून । या देवाला मशीदीमधून ॥
मी न जरी लावी काढून । तरी न म्हणवीन माधव ॥ १५७ ॥
ऐसा देव न मशीदींत । ठेवूं देणार वदतों खचित ॥
येईल वेळीं याची प्रचित । निर्धार निश्चित हा मान ॥ १५८ ॥
ऐसें मिळतां आश्वासन । बाई मनीं सुखायमान ॥
पायीं घालोनि लोटांगण । गेली स्वस्थमन निज ग्रामा ॥ १५९ ॥
पाहूनि शामा नित्यांकित । रक्षावें भक्त मनोगत ॥
साई प्रेमरज्जूनियंत्रित । आला न किंचित कोप तया ॥ १६० ॥
खरें कराया भक्तवचन । प्रणतपाळ करुणाघन ॥
साई दयाळ भक्ताश्वासन । लडिवाळपण पुरवीत ॥ १६१ ॥
शामा अपुला लाडका भक्त । लडिवाळ नेणें युक्तायुक्त ॥
संत भक्तसंकल्प पुरवित । हेंच निजव्रत तयाचें ॥ १६२ ॥
असो, भरतां बारा मास । कृत निर्धार नेला तडीस ॥
तीनचि महिने होतां बोलास । पातलें गर्भास संतान ॥ १६३ ॥
भाग्यें जाहली पुत्रवती । पांचा महिन्याचें बाळ संगती ॥
घेऊनि आली शिरडीप्रती । पतिसमवेती दर्शना ॥ १६४ ॥
पतीनें ही आनंदोनी । साई समर्थ चरण वंदोनी ॥
पायीं पंचशत रुपये अर्पुनी । कृतज्ञ निज मनीं जाहला ॥ १६५ ॥
बाबांचा वारू शामकर्ण । तयाचें सांप्रत वसतिस्थान ॥
तयाच्या भिंती घेतल्या बांधून । रुपये लावून हेच पुढें ॥ १६६ ॥
म्हणोनि ऐसा साई ध्यावा । साई स्मरावा साई चिंतावा ॥
हाच हेमाडा निज विसावा । करी न धांवाधांव कुठें ॥ १६७ ॥

निज नाभींत असतां अनादी । किमर्थ भ्रमावें दिगंतरीं ॥
अखंड विनटत साईपदीं । हेमाड निरवधि सुख लाहे ॥ १६८ ॥
पुढील अध्याय गाहून रसाळ ॥ कैसे बाबांसी भक्त प्रेमळ ॥
मशीदींतून चावडीजवळ । मिरवीत सकळ आनंदें ॥ १६९ ॥
तैसीच बाबांच्या हंडीची कथा । प्रसाददान विनोदवार्ता ॥
पुढील अध्यायीं परिसिजे श्रोतां । चढेल उल्हासता श्रवणास ॥ १७० ॥

स्वस्तिश्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । साईसर्वव्यापकता तदाशिर्ववचन
साफल्यतानाम् । षट्त्रिंशत्तमोऽध्यायः संपूर्णः
श्रीसद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ।

अभिप्राय

श्रीसाईनाथ आणि कंपनीचे इ० स० १९२६ चें क्यालेंडर सदर कंपनीचे मालक रा. रा. शंकर गणपत शिंदे ६४७ शनिवार पेठ पुणे यांजकडून आदरपूर्वक पाठविण्यांत आलें. त्याचा धन्यवादपूर्वक साभार स्वीकार करण्यांत येत आहे. रा. शंकरराव हे श्रीसाईबाबांचे प्रेमळ भक्त असून श्रीसाईलीला मासिकाचे एक वर्गणीदार आहेत. सदर कंपनी इ० स० १९२३ मध्यें स्थापन होऊन क्यालेंडरवर जाहिर केल्याप्रमाणें या कंपनीत पेटंट मेडिसिन्स मिळत असून शिवाय ही कंपनी प्रोव्हिजन व जनरल मर्चंटचें व कमीशनएजंटचेंही काम करीत असते. तिची कौमारावस्था हळू हळू संपत आहे व ती लवकरच वयांत येऊन तिची पूर्ण भरभराट होवो असेंही श्रीसाईलीला मनापासून इच्छित आहे. कुंजवनांत मुरलीधर श्रीगोपालकृष्ण मुरली वाजवीत असतां त्या मुरलीच्या मधुर रवानें गोपींची काय अवस्था झाली असेल याचा निदर्शक एकरम्य देखावा या क्यालेंडरावर दिल्यामुळें त्याला फारच शोभा आली आहे. या गोपालकृष्णाच्या व श्रीसाईसमर्थांचे कृपेनें ही कंपनी चिरायू होवो.

---

## महाराष्ट्र साहित्य संमेलन

महाराष्ट्र साहित्य संमेलनाची अकरावी बैठक खास मुंबईसच येत्या ईस्टरचे सुट्टीचे सुमारास भरविण्याची नक्की योजना महाराष्ट्र साहित्य परिषदेचें कार्यकारी मंडळीनें केली आहे. नागपूर व नाशिक या दोहों ठिकाणींही सदर बैठक होत नाहीं असें दृष्टीस आल्यावर, मुंबईसच भरविण्याचें ठरवावें लागलें. तरी संम्मेलनांत वाचण्यासाठीं व छापून प्रसिद्ध करण्यासाठी सर्व महाराष्ट्रभाषाभिमानी व भक्त अशा कवींनी व लेखकांनी आपल्या आवडत्या विषयांवर कविता व लेख पाठविण्याची मेहेरबानी करावी. स्वतंत्र पत्राची वाट पाहूं नये, अशी चिटणिसांची अत्यागत्याची विनंती आहे.

म. सा. परिषदेची कचेरी
३७२ गिरगांव रोड,
मुंबई नं. २.
१६–२–१९२६

न. र. फाटक
बी. व्ही. रायकर
रा. का. तटणीस
डी. जी. काळे
चिटणीस
११ वें म. सा. संमेलन.